POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३५८ ● मुंबई, शुक्रवार, २९ जूलै २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA


## मुंबई पोलिसांची मोठी कामगिरी! ४०० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त



मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई पोलिसांनी मोठी कारवाई करत एका मोठ्या ड्रग्ज कारखान्याचा पदार्फाश केला आहे. यामध्ये पोलिसांनी १८८ किलो एमडी ड्रग्ज जप्त केले असून या ड्रग्जची किंमत सुमारे ४०० कोटी रुपये असल्याची माहिती मिळाली आहे. तसेच याप्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात आली असून ८ जणांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहेत. हे सर्व आरोपी कर्नाटक मधून मुंबई शहरात टऊड्रग पुरवठा करत होते. दरम्यान, साकीनाका पोलीस ठाण्यात एप्रिल महिन्यात ड्रग्ज पुरवठा प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. यानंतर पोलिसांनी तातडीने तपस सुरु केला असून तपासदरम्यान त्यांना म्हैसूरची माहिती मिळाली. आणि त्यावर धाड टाकल्यानंतर हे ३९० कोटीचे आमली पदार्थ ताब्यात घेण्यात आले आहेत.

**■मुंबई । प्रतिनिधी,**

देशभरात ड्रग्जविरुद्ध पोलिसांची कारवाई सुरूच असल्याचे दिसून येत आहे. अशातच आता मुंबई पोलिसांनी याप्रकरणी मोठी कामगिरी केल्याची माहिती समोर आली आहे. मुंबईतील साकीनाका पोलिसांनी तब्ब्ल ४०० कोटी रुपयांच्या टऊड्रग्जवर कारवाई केली आहे. तसेच पोलिसांनी कर्नाटकातील म्हैसूरमध्येही ड्रग्ज प्रकरणात छापे टाकले आहेत.

म्हैसूरमध्येही छापे

ड्रग्ज प्रकरणात मुंबई पोलिसांनी म्हैसूरमध्येही छापा टाकला आहे. कर्नाटकचे गृहमंत्री जी परमेश्वर यांनीही मुंबई पोलिसांच्या या कारवाईबाबत निवेदन दिले आहे. ते म्हणाले की, मला वाटतं मुंबई पोलिसांनी कोणाला तरी पकडलं आहे, एकतर तस्कर किंवा वापरकर्ता. त्यांनी ते म्हैसूरपर्यंत शोधून काढले आहे. तसेच ज्या व्यक्तीला त्यांनी पकडले आहे त्याने ते म्हैसूरहून आल्याचे विधान दिले आहे आणि ते त्याचा शोध घेत असून त्याला ताब्यात घेतले आहे.

कर्नाटकचे गृहमंत्री जी परमेश्वरा पुढे म्हणाले मी म्हैसूर आयुक्तालयाला अतिशय कडक सूचना दिल्या आहेत. तसेच, राज्यभरात, प्रत्येक एसपीला आता संवेदनशील बनवण्यात आले आहे आणि अशा गोष्टी घडू नयेत यासाठी प्रत्येक आयुक्तालयाला अतिशय कडक सूचना देण्यात आल्या आहेत.

पुण्यात ड्रग्ज पार्टीवर कारवाई

रविवारी पुणे शहरात ड्रग्ज पार्टीचे प्रकरण समोर आले. पोलिसांच्या छाप्यानंतर ७ जणांना अटक करण्यात आली. या सर्व आरोपींना पुण्यातील न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सर्व सातही आरोपींना २९ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.






## एकनाथ शिंदे यांचा हट्ट फडवीसांनी पुरविला
### ठाणे जिल्ह्यात मुख्यमंत्र्यांनी नियुक्त केला शिंदे यांचा हा आवडता अधिकारी

**■ठाणे। प्रतिनिधी,**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे असणाऱ्या नगरविकास विभागाकडून सुरु असलेल्या उधळपट्टीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चाप लावल्याच्या वृत्तामुळे राजकीय वतुर्ळात एकीकडे खळबळ उडाली असली तरी शिंदे यांचा गृहजिल्हा असलेल्या ठाण्यातील प्रशासकीय वतुर्ळावर मात्र आपल्या मजीर्चा अधिकारी बसविण्यात सध्या तरी त्यांना यश आल्याचे चित्र आहे. एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्री पद असताना ठाण्याचे जिल्हाधिकारी म्हणून अशोक शिनगारे यांची नियुक्ती करण्यात आली होती.

शिनगारे निवृत्तीच्या वाटेवर असताना या पदावर शिंदे यांच्या निकटवतीर्याची निवड होणार का अशी चर्चा आहे. भाजप आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शिंदे यांना त्यांच्या ठाणे जिल्ह्यात मोकळीक देणार का, याविषयी देखील तर्कवितर्क लढविले जात आहेत. असे असताना या जिल्ह्याचे पालक सचिव म्हणून एकनाथ शिंदे यांच्या निकटवतीर्याला नियुक्त करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी काळात होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुका डोळ्यासमोर ठेवून नगरविकास विभागाकडून विवीध योजनांच्या माध्यमातून चाललेल्या उधळपट्टील मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस यांनी मध्यंतरी चाप लावण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार विवीध योजनांमधील कामांना मंजुरी देण्यापूर्वी मुख्यमंत्र्यांची मान्यता घेण्याचे नक्की करण्यात आले आहे.




**ठाण्याचे नवे जिल्ह्याधिकारी कोण?**

ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे हे येत्या ३० तारखेला शासकीय सेवेतून निवृत्त होणार आहेत. त्यामुळे ठाणे जिल्ह्याचे नवे जिल्हाधिकारी कोण याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकनाथ शिंदे यांच्याकडे ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री पदही आहे. त्यामुळे आपल्या मजीर्तील जिल्हाधिकारी याठिकाणी असावा असा शिंदे यांचा आग्रह आहे. तसेच झाल्यास जिल्ह्यावर वरचष्मा राखण्यातही शिंदे यशस्वी होतील. ठाणे जिल्ह्यात भाजपचे सर्वाधिक आमदार निवडून आले असले तरी जिल्हाधिकारी आणि ठाणे महापालिकेचे आयुक्तपदी आपल्याच विश्वासाचा अधिकारी हवा असा शिंदे यांचा आग्रह आहे. नव्या जिल्हाधिकारी कोण असेल याविषयी वेगवेगळे तर्कवितर्क लढविले जात असताना पालक सचिव नवीन सोना असतील याची काळजी शिंदे यांनी घेतल्याची आता चर्चा आहे

याशिवाय एकनाथ शिंदे यांच्या अखत्यारित येणाऱ्या एमएमआरडीए, एमएसआरडीसी एमआयडीसी, सिडको यासारख्या महत्वाच्या विभागांमधील मोठया रकमेच्या कामांची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली जावी असे निर्देशही देण्यात आले आहेत.

विशेषतः ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या कामांच्या मंजुरीवर मुख्यमंत्र्यांची मोहर उमटायला हवी असे ठरविण्यात आले आहेत. या घडामोडींमुळे एकनाथ शिंदे यांची नाकाबंदी केली जात असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून राजकीय वतुर्ळात सुरु झाली आहे. एकीकडे ही चर्चा असली तरी ठाणे या आपल्या गृहजिल्ह्यावर आपलेच अधिकारी असतील यासाठी शिंदे करत असलेल्या प्रयत्नांना सध्या तरी यश येताना दिसत आहे.

**एकनाथ शिंदेच्या मर्जीतील अधिकाऱ्याची नियुक्ती**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याचे घेतलेल्या एका निर्णयानुसार नवीन सोना यांची ठाणे जिल्ह्याचे पालक सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नवीन सोना हे उपमुख्यमंत्री कार्यालयातील प्रधान सचिव आहेत. राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठे मताधिक्य मिळाले. भाजपला या निवडणुकीत अभूतपुर्व असे यश मिळाल्याने देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मुख्यमंत्री पद आले.

महायुतीने ही निवडणुक तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली लढवली. त्यामुळे राज्यात सत्ता आल्याने शिंदे यांच्याकडे पुन्हा मुख्यमंत्री पद येईल अशी त्यांच्या समर्थकांची आशा होती. मात्र तसे झाले नाही. देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्री मंडळात शिंदे यांच्याकडे उपमुख्यमंत्री पदासोबत गृहनिर्माण, नगरविकास, रस्ते विकास महामंडळासारखी प्रमुख खाती राहीली आहेत. नव्या मंत्री मंडळात उपमुख्यमंत्री यांच्या कार्यालयाचे प्रधान सचिव म्हणून सोना यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

यापुर्वी राज्याच्या आरोग्य विभागात काम केलेले सोना हे शिंदे यांच्या मजीर्तील अधिकारी मानले जातात. शिंदे यांच्याकडे असलेल्या सर्व खात्यांमधील प्रमुख निर्णयांचे समन्वयक म्हणून ते काम पहातात. शिंदे यांच्यासाठी महत्वाच्या असलेल्या ठाणे जिल्ह्याचे पालक सचिव पद सोना यांच्याकडेच सोपवून त्यांनी आपल्या गृह जिल्ह्यावर प्रभाव राखण्यात यश मिळविल्याची चर्चा आहे.

## बारमधून सरकारी कारभार!
### दारुचे घोट रिचवत क्लिअर केल्या सरकारी फायली

**■नागपूर। प्रतिनिधी,**

नागपूरच्या बिअर बारमध्ये प्रशासकीय कारभार चालत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. दारुचे घोट घेत महाराष्ट्र शासनच्या फाईलींवर सह्या आणि चर्चा असा व्हिडिओच समोर आला आहे. बिअर बारमधले ते तिघे नेमके कोण? असा सवाल सध्या उपस्थित होत आहे. व्हायरल व्हिडिओच्या या सत्यतेचा शोध सुरू असल्याचे समजतेय.

काय आहे नेमकं प्रकरण?

रविवारी नागपूरच्या एका बारमध्ये भर दुपारी दारूचे घोट घेत तीन व्यक्ती चक्क महाराष्ट्र शासनाच्या फायलींचा गठ्ठा घेऊन बसले होते. त्यातील एक जण भरभर या फायलींवर सह्या करतानादेखील दिसत होता. या प्रकाराने शासकीय काम आता बारमध्ये होऊ लागली की काय? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. या घटनेचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर

या प्रकारामुळं प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हे अधिकारी कोण ते कोणत्या विभागाचे आणि त्यांनी कोणत्या फायलींवर सह्या केल्या हे मात्र अद्याप कळू शकलं नाही. मात्र जर या फायली महत्त्वाच्या असतील तर त्यामुळं प्रशासनाच्या कार्यपद्धतींवर गंभीर परिणाम होऊ शकतो.




अधिकारी कोण व फायली कोणत्या खात्याच्या?

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, दुपारी ३:३० च्या सुमारास तीन व्यक्ती मनीषनगरातील या बीअर बारमध्ये आल्या. त्यांनी दारूची ऑर्डर दिली आणि त्यानंतर टेबलावर शासकीय फायलींचा एक मोठा गठ्ठा ठेवला. जवळपास तासभर त्यांच्यात या फायलींवरून गंभीर चर्चा सुरू होती. ही चर्चा नेमकी कोणत्या विषयावर होती, हे स्पष्ट होऊ शकले नाही; परंतु चर्चेनंतर एका व्यक्तीने महाराष्ट्र शासन लिहिलेल्या फायलींवर भराभर सह्या करण्यास सुरुवात केली. नागपूरच्या मनीषनगरातील या प्रसिद्ध बिअर बारमध्ये जागोजागी सीसीटिव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. त्यामुळंच या प्रकरणाचा उलगडा होऊ शकला आहे.

## पावसाळ्यात टेपवर्म संसर्गात झपाट्याने वाढ - मेंदूला होऊ शकतो गंभीर धोका
### मीरा रोड येथील वोक्हार्ट हॉस्पिटल्समधील तज्ञ डॉक्टरांचा इशारा

**■मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबईसह राज्यभरात सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे. अशातच, डॉक्टरांनी मुंबईत टेपवर्मच्या संसर्गाच्या वाढत्या संख्येबद्दल चिंता व्यक्त केली आहे. पुढे आलेल्या अहवालांच्या आधारे, डॉक्टरांनी विशेषतः लक्ष वेधले आहे, जो दूषित अन्न किंवा पाण्याद्वारे टेपवर्मची अंडी खाल्ल्याने होणारा एक गंभीर आजार आहे.पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मुंबईत टेपवर्म संसर्गाच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत आहे, असे मीरा रोड येथील वोक्हार्ट हॉस्पिटल्सचे , कन्सल्टंट इंटरव्हेन्शनल न्युरोलॉजिस्ट डॉ. पवन पै यांनी सांगितले. हे परजीवी संसर्ग प्रामुख्याने दूषित अन्न आणि पाण्याद्वारे पसरतो आणि न्युरोसिस्टिसर्कोसिस नावाचा गंभीर मेंदूचा विकार निर्माण करू शकतो.




याविषयी अधिक माहिती देताना वोक्हार्ट हॉस्पिटल्सचे न्युरोलॉजिस्ट डॉ. पवन पै सांगतात ,"पावसाळ्यात लोक अन्न स्वच्छतेकडे दुर्लक्ष करतात. योग्यरीत्या न शिजवलेले मांस आणि नीट धुतलेली नसलेली फळे-भाज्या या टेपवर्मच्या अळ्यांचे प्रमुख स्रोत आहेत. या अळ्या शरीरात गेल्यावर मेंदूत पोहोचतात आणि तिथे सिस्ट तयार करतात, जे झटके येणे, तीव्र डोकेदुखी आणि कधीकधी कायमस्वरूपी मेंदूच्या कार्यात बिघाड निर्माण करतात. पावसाळ्यातील पूरपरिस्थिती आणि स्वच्छतेची बिघडलेली अवस्था हे संसर्गाच्या प्रसाराचे मुख्य कारण ठरत आहे. लहान मुले आणि इम्युन सिस्टिम कमकुवत असलेल्या व्यक्ती विशेषतः धोका पत्करत आहेत.

हा संसर्गरोग टाळण्यासाठी वोक्हार्ट हॉस्पिटल्सने केवळ उकळलेले किंवा फिल्टर केलेले पाणीच पिण्याचे , तसेच सर्व फळे व भाज्या व्यवस्थित स्वच्छ धुवून घेण्याचे व मांस पूर्णपणे शिजवूनच सेवन करण्याचे आवाहन नागरिकांना केले आहेः या संसगार्चे वेळेवर निदान — जे सहसा मेडिकल इमेजिंगद्वारे केले जाते — आणि योग्य उपचार हे दीर्घकालीन गुंतागुंतींपासून वाचवू शकतात व मेंदूचे आरोग्य सुरक्षित ठेवू शकतात. वोक्हार्ट हॉस्पिटल्सचे न्युरोलॉजिस्ट डॉ. पवन पै सांगतात, "दीर्घकाळ राहणारी डोकेदुखी किंवा झटके यांकडे दुर्लक्ष करू नका. तत्काळ वैद्यकीय सल्ला घेणे प्राणवाचक ठरू शकते आणि गंभीर परिणाम टाळू शकते."

## महावितरण कंपनीने स्मार्ट मीटर बसविताना ग्राहकांची संमती घ्यावी : केदार काळे




**■पालघर । प्रतिनिधी,**

सध्या पालघर जिल्ह्यात व महाराष्ट्रात महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मर्यादित म्हणजेच महावितरण कंपनीने नवीन स्मार्ट मीटर बसविणे सुरू केले आहे, याबाबत ग्राहकांच्या खूप तक्रारी आहेत, म्हणून शिवसेनेचे प्रवक्ते श्री केदार काळे यांनी कार्यकारी अभियंता महावितरण पालघर विभाग यांना पत्र लिहून स्मार्ट मीटर बसविण्याआधी ग्राहकांची परवानगी घ्यावी अशी मागणी केली आहे, श्री काळे पुढे म्हणतात महावितरणचे अधिकारी ग्राहकांची परवानगी न घेता स्मार्ट मीटर बसवीत आहेत, बहुसंख्या ग्राहकांचा ह्याला विरोध आहे, ग्राहकांचे म्हणणे महावितरण चे अधिकाऱ्यांनी ऐकून घ्यावे असेही काळे यांचे म्हणणे आहे. ग्राहकांच्या म्हणण्यानुसार आधीचे साधे मीटर व आत्ता बसवलेली नवीन स्मार्ट मीटर यामध्ये विद्युत बिलाची तफावत आहे पूर्वीच्या विद्युत बिला पेक्षा स्मार्ट मीटर मध्ये विद्युत बिल जास्त येते.

महावितरण चे अधिकारी हे खरे नाही असे म्हणतात, दोन दिवसांपूर्वी महावितरणचे महाराष्ट्राच्या प्रो. श्री केदार काळे यांचे बोलणे झाले, महावितरणची बाजू मांडताना बिल जास्त येत नसल्याचे सांगितले, विद्युत ग्राहकांना रोज एस.एम.एस येतो त्यांनी किती युनिट्स वापरली असेही सांगितले.

पण ग्रामीण भागातील ग्राहकांना हे मंजूर नाही म्हणून ग्राहकांनी दोन मागण्या महावितरण कडे केल्या आहेत. ग्राहकांच्या इच्छेविरुद्ध किंवा ग्राहकांची परवानगी नसताना महावितरण ने स्मार्ट मीटर बसू नये, तसेच स्मार्ट मीटर नसताना येणारी विद्युत व स्मार्ट मीटर बसल्यानंतर येणारी विद्युत बिले यांचा अभ्यास करून व ग्राहकांच्या घरात कोणती विद्युत उपकरणे आहेत हे बघून जास्तीची विद्युत बिले कमी करावीत. हा विषय वरिष्ठांकडे नेऊन कायमस्वरूपाचा त्यात तोडगा काढावा असे केदार काळे यांचे म्हणणे आहे. त्यासाठी महावितरण नी एक विद्युत परिषद घ्यावी त्यात लोकप्रतिनिधी व पक्षीय कार्यकर्ते व महत्त्वाचे म्हणजे ग्राहकांना बोलून त्यांच्या तक्रारी ऐकून घेऊन तेथेच सोडवण्यात याव्यात.

## येशूलाच देव माना इतर कुठलेही देव नाहीत, हिंदू धर्मातील नागरिकांचं ख्रिश्चन धर्मात परिवर्तन करण्याचा प्रयत्न, दोघांना अटक

**■पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यातील पिंपरी कॅम्पमध्ये धर्मांतर करण्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी अमेरिकन नागरिक आणि भारतीय वंशाच्या नागरिकाला पिंपरी पोलिसांनी अटक केली आहे. येशूला देव माना इतर कुठलेही देव नाहीत. ख्रिश्चन धर्मात प्रवेश केल्यास सुख, समृद्धी लाभेल असे म्हणून पिंपरी कॅम्प येथे धर्मपरिवर्तनाचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**हिंदू धमार्तील नागरिकांचं ख्रिश्चन धर्मात धर्मपरिवर्तन करण्याचा प्रयत्न**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,




**नागरिकांना पैशांच देखील अमीष दाखवलं**

ख्रिश्चन धर्म किती श्रेष्ठ आहे, हे सांगितलं जातं होत. ख्रिश्चन धर्म वगळता कुठलाच धर्म महत्वाचा नाही. या विश्वासात केवळ येशूच आहे. इतर धर्म केवळ कथा आहेत. इतर देवतांना न मानता तुम्ही येशूला माना असे सांगून नागरिकांना धर्मांतर करण्याचा प्रयत्न अमेरिकन नागरिक आणि भारतीय नागरिक असलेला स्थिव्हन कदम करत होता. ख्रिश्चन धर्मात धर्मपरिवर्तन केल्यास तुम्हाला सुख, समृद्धी, आरोग्य लाभेल. अस नागरिकांना पटवून दिले जात होत. पैशांचा देखील अमीष दाखवलं जात होतं. अखेर याप्रकरणी काही सजग नागरिकांनी थेट पिंपरी पोलीस ठाणे गाठून सर्व प्रकार

शेफर जाविन जेकॉब स्टीव्हन विजय कदम अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नाव आहेत. यांच्यासह १६ वर्षीय बालकाचा यात समावेश आहे. नोटीस देऊन पिंपरी पोलिसांनी त्याला सोडून दिले आहे. पिंपरी कॅम्पमध्ये अमेरिकन नागरिक असलेल्या शेफर जेकॉब आणि स्टीव्हन कदम हा हिंदू धमार्तील नागरिकांचं ख्रिश्चन धर्मात धर्मपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करत होता. नागरिकांच्या घराबाहेर जाऊन त्यांना आवाज देऊन येशू विषयी माहिती दिली जात होती. पिंपरी पोलिसांनी तात्काळ अमेरिकन नागरिक आणि भारतीय नागरिकाला अटक केली आहे. अमेरिकन नागरिक शेफर जेकॉब हा एक वर्षाच्या मुदतीवर भारतात आलेला आहे. येशूलाच देव माना, दुसरा कोणताही देव नाही असं सांगून धर्मपरिवर्तन करण्याचा प्रयत्न पिंपरी कॅम्पमध्ये अमेरिकन नागरिक असलेल्या शेफर जेकॉब आणि स्टीव्हन कदम हा हिंदू धमार्तील नागरिकांचं ख्रिश्चन धर्मात धर्मपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करत होता. येशूलाच देव माना, दुसरा कोणताही देव नसल्याची माहिती हे दोघे नागरिकांना देत होते. ख्रिश्चन धर्मात सुख, समृद्धी लाभेल असे म्हणून पिंपरी कॅम्प येथील नागरिकांचे धर्मपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# बुडीत कर्जाची धोकादायक परंपरा !

सदेत चालू असलेल्या पावसाळी अधिवेशनात अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी राज्यसभेत 'मागील १० वर्षांत सरकारी बँकांनी १२ लाख ८ सहस्त्र कोटी रुपयांचे कर्ज बुडीत काढले', अशी अतिशय गंभीर माहिती दिली. या कर्जाची रक्कम पुन्हा मिळण्याची शक्यता अल्प असल्याचेही पंकज चौधरी यांनी नमूद केले. बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, कॅनरा बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया आदी प्रथितयश बँकांचा यामध्ये समावेश आहे. कर्ज बुडवणारे ९ आरोपी परदेशात पळून गेल्याची माहितीही पंकज चौधरी यांनी त्यांच्या भाषणात दिली. ही केवळ सरकारी बँकांची स्थिती आहे; मात्र देशातील खासगी बँका, सहकारी बँका, को-ऑपरेटिव्ह बँका यांमध्ये मागील काही वर्षांत घोटाळे पुढे आले, त्यावरून बुडीत कर्जाची रक्कमही कोट्यवधी रुपयांच्या घरात असेल, हे सांगायला कुणा तज्ज्ञाची आवश्यकता नाही. बुडीत कर्जामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवरील दूरगामी परिणाम अर्थात महागाई वाढ, करवाढ आदी येनकेन प्रकारेण देशवासियांना बसणारा फटका हा एक स्वतंत्र विषय ठरेल; मात्र मागील काही वर्षांत बुडीत कर्ज आणि बँकांचे घोटाळे हे देशाच्या आर्थिक स्थितीविषयी प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहेत. जी कर्जे बुडीत घोषित करण्यात आली, त्यामध्ये कर्जाचे हप्ते भरता येत नाहीत. त्यामुळे परदेशात पळून गेलेले धनाढ्य, स्वतःच्या लाभासाठी कर्ज घेऊन त्याचा अपलाभ घेणारे सहकारी बँकांचे पदाधिकारी, सहकारी सोसायट्यांचे मालक यांचा भरणा अधिक आहे. भ्रष्टाचार, आर्थिक घोटाळे, सर्वसामान्य गरीब लोकांच्या पैशांवर डल्ला मारून स्वार्थ साधण्याची ही दुष्प्रवृत्ती देशासाठी अतिशय घातक आहे. स्वतःला चैन-विलासी जीवन जगता यावे, यासाठी भ्रष्टाचार करून पैसा मिळवायचा, हा पैसा भलेही रोजंदारीतून बँकेत बचत करणाऱ्या गरिबांचाही का असेना, तो हडप करून पसार होणारी ही वृत्ती देशासाठी हानीकारक आहे.'आयसीआयसीआय बँके'च्या अध्यक्षपदावर असतांना चंदा कोचर यांनी 'व्हिडिओकॉन समूहा'ला १ सहस्त्र ७३५ कोटी रुपयांचे कर्ज दिले. वर्ष २००९ ते २०११ मध्ये हा प्रकार घडला होता. अध्यक्षपदाचा गैरवापर करून व्हिडिओकॉनला कोट्यवधी रुपयांचे कर्ज संमत करून त्या बदल्यात स्वतःचा आर्थिक लाभ करून घेणारे चंदा कोचर आणि त्यांचे पती दीपक कोचर यांना केंद्रीय अन्वेषण यंत्रणेने कह्यात घेतले अन्‍यात सहभागी असलेले 'व्हिडिओकॉन समूहा'चे मुख्य वेणूगोपाल धूत यांनाही अटक झाली. वर्ष २०१८ मध्ये निवृत्त न्यायमूर्ती बी.एन्. श्रीकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आणि वर्ष २०१९ मध्ये या तिघांच्या विरोधात गुन्हा नोंदवून वर्ष २०२२ मध्ये या तिघांना अटक झाली. यापूर्वीही उद्योजक विजय मल्ल्या, हिरे व्यापारी नीरव मोदी, मेहूल चोक्सी यांनी बँकांकडून कोट्यवधी रुपयांचे कर्ज घेऊन परदेशात पलायन केले. त्यांच्याकडून काही प्रमाणात पैसे वसूल करण्यात सरकारला यश आल्याची वृत्ते अधूनमधून प्रसिद्ध होत असतात. मुळात बुडव्यांकडून पैसे वसूल करण्याच्या कामगिरीला यश म्हणणे, हीच अगतिकता आणि देशाची नाचक्की आहे. कोचर दांपत्य असो वा परदेशात पसार झालेले उद्योगपती असोत, हे बँकेमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात घोटाळे करू शकले, याला काही प्रमाणात बँकांतील अधिकारीही तितकेच उत्तदायी ठरतात.केंद्रीय अर्थराज्यमंत्री बुडीत कर्जाची आकडेवारी घोषित करतात, तेव्हा त्यावरील उपाययोजनांकडेही तेवढ्याच गांभीर्याने पहायला हवे. बुडीत कर्जाची कोट्यवधी रकमेची आकडेवारी देशाची पोलीस यंत्रणा, न्यायव्यवस्था आणि बँकिंग क्षेत्र यांच्या विश्वासार्हतेची लक्तरे वेशीवर टांगणारी आहे. बँकांमध्ये आर्थिक शिस्त टिकून रहावी, यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकांना जी नियमावली दिली आहे, तिला बगल देऊन बँकांकडून कोट्यवधी रुपयांची कर्जे दिली जातात. कर्ज देतांना तारणाची खात्री केली जात नाही. काही उद्योजक कर्ज स्वतःच्या नावावर घेतात; परंतु त्यांचे हप्ते वेळेत भरत नाहीत, तेव्हा त्याच वेळी बँकांकडून कठोर कारवाई केली जात नाही. बुडीत कर्जाकडे होणारी वाटचाल बँकांकडून लपवली जाते. बुडीत कर्ज दाखवावे लागू नये, यासाठी काही बँका पुन्हा कर्जदारांना त्यांच्या कुटुंबियांच्या नावे कर्ज दाखवून त्यामधून हप्ते वसूल करतात. असे विविध प्रकारांद्वारे बँकांतील घोटाळे देशात होत आहेत.विजय मल्ल्या, नीरव मोदी, मेहुल चोक्सी आणि अन्य उद्योजक देशाबाहेर पलायन करतात, तेव्हा त्याला येथील यंत्रणाही कारणीभूत ठरते. भ्रष्टाचार करणाऱ्यांना त्वरित आणि कठोर शिक्षा होईल, तेव्हाच अशा प्रकरणांना आळा बसेल. महाराष्ट्रातही मागील काही वर्षांत स्थानिक बँकांतील घोटाळ्यांचे अनेक प्रकार पुढे आले. नागपूर जिल्हा सहकारी बँक घोटाळा असो किंवा रूपी सहकारी बँक घोटाळा असो, असे अनेक घोटाळे राज्यात घडले. या घोटाळ्यांतील पैशांची वसुली करून गुंतवणूकदारांना त्यांच्या गुंतवणुकीचे पैसे परत मिळणे, हे जवळजवळ दुरापास्त असते. ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये तर काही गुंतवणूकदारांची जीवनातील सर्व आर्थिक पुंजी या घोटाळ्यांतून हातची निघून जाते. त्यांना शोक करण्याविना कोणता पर्याय रहात नाही. राष्ट्रीय बँक किंवा ग्रामीण भागांतील सहकारी क्षेत्रातील काही कोट्यवधी रुपयांचे घोटाळे असोत, ते बँकिंग क्षेत्राचे वाभाडे काढणारे आहेत. घोटाळा झाल्यानंतर त्याचे खटले वर्षानुवर्षे न्यायालयांमध्ये चालणे, आरोपी पसार होणे, कोट्यवधी रुपयांचा घोटाळा होऊनही काही वर्षांत आरोपींची जामिनावर सुटका होणे, गुंतवणूकदारांना गुंतवणुकीचे पैसे प्राप्त न होणे हे सर्व प्रकार रोखण्यासाठी व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. सहस्त्रो लोकांचे जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या बँकिंग घोटाळ्यांना रोखण्यासाठी बँकांनी आर्थिक शिस्त पाळायलाच हवी. त्यासाठी रिझर्व्ह बँकेचे बँकांवर चांगल्या प्रकारे नियंत्रण असायला हवे. असे खटले जलद गती न्यायालयात चालवून आरोपींना कठोर शिक्षा व्हायला हवी. असे न झाल्यामुळे बँकांसह देशाची आर्थिक स्थिती ढासळण्याकडे वाटचाल होते, तसेच आर्थिक घोटाळ्यांना ते वाव देणारे ठरते, यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँक यांना कठोर व्हावेच लागेल. केवळ कठोर कायदा करून हा प्रश्न त्वरित सुटेल, असेही नाही. गोरगरिबांच्या पैशांवर डल्ला मारून विलासी जीवन जगणे, ही भारतीय संस्कृती नाही. प्रसंगी स्वतः कष्ट घेऊन अन्यांचे भले करणारी भारताची समृद्ध आणि विश्वकल्याणाची परंपरा आहे. पाश्चात्त्य विलासी जीवन नव्हे, तर त्यागावर आधारित हिंदु संस्कृतीचे शिक्षण शाळांमधून दिल्यास अशा प्रकारांना निश्चितच काही प्रमाणात आळा बसेल. कर्ज घेऊन ते बुडवत विलासी जीवन जगणारी नव्हे, तर कष्ट करून आत्मसन्मानाने जगणारी भारतीय परंपरा युवा पिढी जेव्हा आत्मसात करील, तेव्हाच असे प्रकार रोखले जातील.

## जावई हा दहावा ग्रह असतो...

बादशहा अकबराचे एकदा त्याच्या जावयाशी जोरदार भांडण झाले. संतापलेल्या सासरा अकबराने राज्यातील सगळ्या जावयांना सुळावर चढवण्याचा हुकूम दिला. अकबराच्या या लहरी हुकूमामुळे राज्यातील सगळेच जावई घाबरून गेले. त्यात कोणाचे ना कोणाचे नुकतेच जावई झालेलेही होतेच तर जुनेजाणते जावईही होते. बादशहाचे त्याच्या जावयाशी झालेल्या भांडणाची शिक्षा सगळ्याच जावयांना त्यांचा कोणताही गुन्हा नसताना भोगावी लागणार या भीतीने सगळेच जावई गारठून गेले, या अडचणीतून सोडवण्यासाठी आणि बादशहा अकबराला सुबुद्धी मिळावी म्हणून राज्यातल्या जावयांचे एक शिष्टमंडळ बिरबलाकडे गेले.बादशहाच्या या लहरी हुकूमातून आम्हाला वाचवा अशी विनवणी त्यांनी बिरबलला केली. बिरबलाने थोडा विचार करून त्यांना तुम्ही चिंता करू नका, मी पाहतो काय ते असं बोलून त्यांना परत पाठवले आणि लगोलग राज्याच्या मुख्य धातू कारागिराला वेगवेगळ्या धातूचे कित्येक सूळ बनवण्यास सांगितले, यात काही सूळ लोखंडाचे होते, काही तांब्याचे तर काही मौल्यवान सोन्याचांदीचे हिरेजडीत सूळ बनवण्यास बिरबलाकडून सांगण्यात आले. बादशहाच्या कानावर ही बातमी गेली तेव्हा त्याने बिरबलास बोलवणे धाडले आणि म्हणाला, बिरबला वेगवेगळे सूळ बनवण्याचे उद्योग का करत आहेस? त्यावर बिरबल म्हणाला, महाराज आपल्या हुकूमाच्या अंमलबजावणीसाठी हे सगळे केले जात आहे.राज्यातले सगळेच पुरुष कोणाचे ना कोणाची जावई आहेतच, यात सामान्य लोकांसोबतच वतनदार, अधिकारी, जमीनदारही आहेत. त्यांच्या समाजातील दर्जानुसार त्यांना सुळावर चढवण्यासाठी हे वेगवेगळे सूळ बनवण्यास घेतले आहेत. हा हिरेजडीत सूळ तर प्रत्यक्ष आपल्यासाठीच आहे, यावर राजा अकबर चपापला आणि म्हणाला, माझ्यासाठी का? यावर बिरबल म्हणाला, राज्यातल्या सगळ्याच जावयांना सुळावर चढवण्याचा आपण दिलेला हुकूम आपल्यालाही लागू होतोच की, आपणही बेगमसाहेबांच्या वडिलांचे जावईच आहात ना, यावर राजा अकबराने आपला मूर्खपणाचा हुकूम मागे घेतला. जामातो दशमो ग्रहा या संस्कृत वचनानुसार जावई हा दहावा ग्रह असल्याने त्याची दहशत राजकारणातही कायम आहे. भले भले राजकारणी त्यांच्या जावयां मुळे अडचणीत आले आहेत. त्यामुळेच या जावयाचा मानपान, त्याचे रुसणे फुगणे सासरकडच्यांना सहन करावे लागते.राजकारण किंवा समाजकारणात जास्तीची सवलत मिळाल्यास स्वतःला सरकारचे जावई समजता का? अशी हेटाळणी महाराष्ट्राच्या राजकारणात नवी नाही. सम्राट अकबरासारख्याच जावयांनी त्रासलेल्या राजकारण्यांनी आता अखिल भारतीय जावई पीडित संघटनाकाढण्यास हरकत नाही, रत्नाकर मतकरींच्या जावई माझा भला नाटकातला भला जावई आणि प्रेमळ सासरा राजकारणाच्या पटावर चालत नाही. इथं ह्यखट्याळ जावई आणि ह्यनाठाळ सासराच असावा लागतो. मराठीतल्या जावयाची जात चित्रपटातल्यासारखा, कुटुंबात लाडका जावई असणं हे पुण्यकर्म असतं तर राजकारणात जावयाचे लाड पुरवणं अडचणीत आणणारं ठरतं. एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांना पुण्यात रेव्ह पार्टीतून पोलिसांनी अटक केली. त्यावर खडसे यांनी खेवलकर हे जर प्रकरणात दोषी असतील तर त्यांना कायद्यानुसार जी कारवाई होईल, त्याला सामोरे जावे लागेल, असे स्पष्ट केले. या मुद्द्यावर ठाकरेंच्या शिवसेनेच्या संजय राऊतांनी खडसेंच्या बाजूने भाजपवर निशाणा साधून संपूर्ण भाजपच रेव्ह पार्टी असल्याचं विधान केले. एकेकाळी विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाणारे पुणे आता रात्री रंगणाऱ्या रेव्ह पार्टीमुळे ओळखले जात आहे. या कथित रेव्ह पार्टीवर टाकलेल्या धाडीत अंमली पदार्थही ताब्यात घेण्यात आले आहेत.काँग्रेसच्या तत्कालीन अध्यक्षा सोनिया गांधी यांचे जावई रॉबर्ट वाड्रा यांच्यावर हरियाणातील जमीन व्यवहार आणि भ्रष्टाचाराचे आरोप झाले. त्यामुळे सोनिया गांधींना २०१४ च्या निवडणुकीत विरोधकांकडून लक्ष्य करण्यात आले. तर राष्ट्रीय जनता दलाचे नेते लालू प्रसाद यादव यांचे जावई तेज प्रताप यादव यांचे वैवाहिक जीवन आणि त्यांच्याशी संबंधित वाद यामुळे लालू यांच्या पक्षाला बिहारमधील राजकारणात टीकेचा सामना करावा लागला. देशभर गाजणाऱ्या मधुजाल प्रकरणात एकनाथ खडसे आणि गिरीश महाजन यांच्यात जोरदार शाब्दीक खडाजंगी सुरू असताना खडसेंवर भाजपातून लक्ष्य करण्यात आले. त्यात तथ्य आहे किंवा नाही हे येत्या चौकशीतून समोर येईल.पुण्यातल्या रेव्ह पार्टीत मोठ्या प्रमाणात पैसे उधळल्याचे आणि लाखोंमध्ये किंमत असलेल्या मद्य आणि इतर अमली पदार्थ बाळगल्याचा आरोप झाला आहे.

# पर्यावरणाच्या रक्षणासाठी नागपंचमीच्या निमित्ताने व्हावे वृक्षारोपण

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.



श्रावण महिना आला की आगळे-वेगळे वातावरण निर्माण होते व सणांना सुरूवात होवून सर्वत्र उत्साह दिसून येतो.श्रावण महिन्यात नागपंचमीला अत्यंत महत्व दिल्या जाते. नागपंचमीच्या दिवशी घरोघरी नागाच्या प्रतिमेची पूजाअर्चना केली जाते.नागपंचमीचा उल्लेख आपल्याला अनेक पुराणांमध्ये सुध्दा पहायला मिळतो.नागपंचमीचे महत्व भगवान श्रीकृष्णांशी सुध्दा निगडित आहे.याबाबतची कालियामर्दनाची आख्यायिका प्रसिद्ध आहे.या आख्यायिकेनुसार बालपणातील श्रीकृष्णाला मारण्यासाठी कंस कालिया नावाच्या नागाला पाठवितो. परंतु श्रीकृष्ण कालियाचा पराभव करतो व यमुना नदीच्या पात्रातून श्रीकृष्ण सुरक्षीत वर येतात तो दिवस म्हणजे श्रावण शुद्ध पंचमी.पराभवानंतर कालिया नाग श्रीकृष्णाची माफी मागतो आणि तेथुन निघुन जातो. त्यामुळे कालिया नागावरील कृष्णाच्या विजयाला सुध्दा नागपंचमीच्या स्वरूपात साजरी केली जाते.दर १२ वर्षांनी नागपंचमीच्या दिवशी देशभरातील नाथ संप्रदायाचे लोक गंगा-गौतमी (अहिल्या - गौतमी) संगमावर स्नान करतात. अशीही आख्यायिका आहे की एक शेतकरी शेत नांगरणी करीत असतांना नागिणीच्या तीन पिल्लांचा मृत्यू झाला व त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला अशी समजूत प्रचलित आहे.त्यामुळे या दिवशी शेतकरी आपल्या शेतात नांगर,वखर,कोणतेही खोदकाम करीत नाही.त्याचप्रमाणे घरकामात वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही अवजारांचा वापर केला जात नाही.भाज्या चिरायच्या नाही,तव्याचा वापर नाही,कांडन नाही,कापन नाही,असे काही नियम आजही पाळले जातात.नागपंचमीच्या दिवशी श्रद्धाळू नागदेवतेच्या फोटोंची किंवा मुर्तीची पुजाअर्चना करून दूध-लाह्यांचा व शिऱ्याचा प्रसाद करून नैवेद्य दाखवतात आणि शेतीचे व आपले संरक्षण करण्यासाठी सर्वच प्रार्थना करतात. श्रावण माहिन्यात प्रत्येक सोमवारला अनेक मंदिरांमध्ये शेज(सजावट) केल्या जाते.त्याचप्रमाणे प्रत्येक देवतांच्या ठराविक दिवशी नीटनेटकी सजावट करून संपूर्ण श्रावण महिना मोठ्या उत्साहाने पाळला जातो.श्रावण महिन्यातील सोमवार हा उपवास बहुतेक सर्वच जण करतात व मोठ्या भक्तिभावाने शंकराची, शंकराच्या पिंडेची व नागाची पुजाअर्चना करतात. नागपंचमी हा श्रावण महिन्यातील पहिला सण असल्याने सर्वत्र आनंदमय व सुखमय वातावरण दिसून येते.श्रावण मासात विविध सण येतात त्यापैकी नागपंचमी, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा इत्यादी अनेक सण येतात. सांगली जिल्ह्याच्या पश्चिमेला असलेला शिराळा तालुका नागपंचमीसाठी जगप्रसिद्ध आहे.सांगली जिल्ह्यातील हा एकमेव प्रदेश निसर्ग समृद्ध आहे.पूर्वी नागपंचमी उत्सव शिराळ्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जायचा.तेव्हा नागपंचमीच्या एक महिना आधी येथील ''नाग मंडळे''नाग पकडायच्या मोहिमेला निघत.यानंतर पकडलेल्या नागांची (सापांची) नागपंचमी संपेपर्यंत योग्य प्रकारे काळजी घेतली जात असे. नागपंचमीच्या दिवशी शिराळा गावात ग्रामदेवतेची पूजा करून नागांची एकाच वेळी मिरवणूक काढली जायची. परंतु वन्य जीव संरक्षण कायद्यानुसार २००२ पासून सापांना पकडण्यावर बंदी आली.त्यामुळे काही वर्षांपासून शिराळ्यात फक्त नागाच्या प्रतीकात्मक मुतीर्ची मिरवणूक काढली जाते. सध्या शिराळामध्ये ६५ नागराज मंडळे आहेत ही प्रतिकात्मक नाग पूजा करतात व प्रतिकात्मक नागमूतीर्ची मिरवणूक काढतात.आज वन्य जीव संरक्षण कायद्यामुळे अनेक प्राण्यांना जीवनदान मिळाले आहे.त्यामुळे संपूर्ण प्राणीमात्रांची जोपासना करण्याचे दायित्व आपणासर्वांवर आहे.आजही भारतातील महाराष्ट्र,राजस्थान, गुजरात,केरळ, तामिळनाडू या प्रांतात नाग पूजा मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरी केली जाते.मध्यप्रदेशातील सातपुडा पर्वतावर भारतातील तीर्थस्थान नागव्दार प्रसिद्ध आहे.याठीकाणी नागाचा वास मोठ्या प्रमाणात असल्याचे सांगितले जाते.त्यामुळे याठीकाणी संपूर्ण श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणात यात्रा असते.त्याचप्रमाणे याच परिसरात जटाशंकर नागाचे प्रसिद्ध ठिकाण आहे.येथील अशी आख्यायिका आहे की भगवान शंकरजींचे तांडव सुरू असतांना आपल्या केसांच्या जटा याच ठिकाणी आपटल्या होत्या.त्यामुळे या तिर्थक्षेत्राला जटाशंकर म्हणून संबोधले जाते. श्रावण महिन्यांत बेलपत्तीला जास्त महत्त्व आहे.त्यामुळे शंकराची व नागाची पूजाअर्चा करतांना बेलफुल वापरण्यात येतो.भारतीय संस्कृतीत प्रत्येक प्राणी,वनस्पती, फुल एवढंच काय तर संपूर्ण सृष्टीला देवाच्या रूपात पाहिलं जाते.त्यामुळे नागपंचमीच्या निमित्ताने संपूर्ण प्राणीमात्रांना वाचविण्याचासाठी निसर्ग प्रफुल्लित ठेवणें अत्यंत गरजेचे आहे.याकरीता श्रावण महिन्याचे व नागपंचमीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला पाहिजे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित राहील व जंगलातील प्राण्यांना जंगलात रहाण्याचा आनंद मिळेल.आज पृथ्वीला वाचवायचे असेल तर प्रत्येक सणांना मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करणे अत्यंत गरजेचे आहे .कारण वृक्षाशीवाय सृष्टी अधुरी आहे.त्यामुळे सर्वांसाठीच वृक्ष अनिवार्य आहे.पृथ्वी साबुत रहाली तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित राहील अन्यथा विनाश अटळ आहे.कारण वृक्ष कटाईमुळे पृथ्वीचे संतुलन डगमगत आहे.त्यामुळे भुकंप, महाप्रलय, सुनामी,अती थंडी,अती उष्णता, ज्वालामुखी, दुष्काळ,भूस्खलन, समुद्राची पातळी वाढते अशा विविध धोकादायक घटना दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत असून भयावह रूप धारण होत आहे.याकरीता येणाऱ्या विनाशापासुन वाचण्यासाठी ''झाडे लावा जीव सृष्टी वाचवा'' हा मूलमंत्र सर्वांनीच अंगिकारला पाहिजे.नागव्दार स्वामी की जय !जय नाग देवता !हर हर महादेव !

# एक हजार आदिवासी विवाहबंधनात...!



कोकणातील रायगड जिल्ह्यात आजही आदिवासी मोठ्या प्रमाणावर आहेत. रायगड जिल्ह्यातील आदिवासी पाड्याचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनस्तरावर जसे प्रयत्न होत असतात त्याप्रमाणेच आदिवासींच्या विकासासाठी सामाजिक स्तरावरही काम होत असतं. वर्षानुवर्षे आदिवासी लोक रानावनात कष्ट करून जीवन जगण्याचा प्रयत्न करत आहेत. सर्वसामान्यांपेक्षाही आदिवासींचा जीवनसंघर्ष फारच वेगळ्या पातळीवरचा आहे. ज्यांना आजच्या दिवसाचीच भ्रांत आहे, त्यांना त्यांच्या आयुष्यातील उद्या कसा उजाडेल याबद्दल काहीच कल्पना नसते. आदिवासीचं जगणं हे अशाचं स्वरूपातच आहे. रानावनात शेतात काबाडकष्ट करायचे आणि जगण्याची धडपड करायची हेच त्यांच जीवन असत. सामान्यतः जगातील कोणत्याही बदलापासून घडणाऱ्या घडामोडींपर्यंत सर्वच बाबतीत आदिवासी नेहमीच चार हात नव्हे, तर कोसो मैल दूरच असतात. त्यामुळे अशा या आदिवासींच्या आयुष्यात प्रकाशवाटा बनून काही सामाजिक संस्था पुढे आल्या आहेत. शासकीय स्तरावर ज्या आदिवासींसाठी योजना राबवल्या जातात, त्या योजनांची माहिती पुरवण्याचे काम या संस्था करतात. आदिवासी कातकरी समाजसेवा संस्थेने पुढाकार घेऊन, शासनाच्या आदिवासी एकात्मिक विकास योजनांतर्गत आदिवासी जोडप्यांचा विवाहसमारंभ पार पाडला. एक-दोन नव्हे तर तब्बल एक हजार आदिवासी जोडपी विवाहबंधनात अडकली. अत्यंत साधेपणाने हा विवाह सोहळा पार पडला. खरंतर लाखो रुपयांची विवाह समारंभांवर उधळण करणाऱ्या समाजासमोर हा विवाह सोहळा आदर्श ठरणारा आहे. संपूर्ण रायगड जिल्ह्यातील एक हजार जोडप्यांचा विवाह करण्यात आला. यासाठी संस्थेचे पदाधिकारी, आदिवासी विकास विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी भरपूर मेहनत घेतली आहे. या अशा उपक्रमातून आदिवासी समाजाला समाजातील मुख्यप्रवाहात आणण्याचा हा सकारात्मक प्रयत्न आहे. कोकणातील या आदिवासी समाजाच्या विकासासाठी केंद्र व राज्यसरकारच्या अनेक योजना आहेत. या योजना केवळ शासनाच्या कागदांवरच न राहता, काबाडकष्ट करणाऱ्या आणि खऱ्याअर्थाने मागास असलेल्या आदिवासी घटकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. आदिवासी समाजातील तरुणांच्या शिक्षणाची व्यवस्था करत त्यांनाही शासकीय योजनांचा लाभार्थी बनवल पाहिजे. यामुळेच रायगड जिल्ह्यात हा एक हजार आदिवासींचा विवाह सोहळा निश्चितच सर्व समाज घटकांना आदर्शवत वाटतो.

### मिरकरवाडा बंदर वयात येतय...!

कोकणच्या किनारपट्टीवरील बंदरे आता कुठे चर्चेत येऊ लागली आहेत. गेल्या सात महिन्यात खऱ्याअर्थाने कोकणातील या बंदरांच्या विकासाचा विचार अधिक गतिमान होऊ लागला आहे. वाढवण हे आंतरराष्ट्रीय स्तरावरचे बंदर कोकणात उभे राहत आहे. परंतु त्याचबरोबर कोकणातील अन्य किनारपट्टीवरीलही बंदरांचा विकास होत आहे. त्यामुळे कोकणातील तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील मिरकरवाडा बंदर असंच एक व्यावसायिक स्तरावरचे मोठं बंदर आहे. १९७८ साली जेटी बांधायला घेतली. २०१३ सालीही या बंदराच्या जेटीचा दुसरा टप्पा सुरू होणार होता; परंतु मिरकरवाडा बंदराचा विकास हा गाळात रूतला गेला.

मिरकरवाडा बंदरातील गाळही गेली काही वर्षे काढण्यात येत होता. मात्र, मिरकरवाडा बंदरावर काही वर्षांपासून अनधिकृत झोपड्या, अनधिकृत बांधकाम उभी राहिली. रत्नागिरीतील मिरकरवाड्याच हे बंदर खरंतर झोपडपट्टी आणि अनधिकृत बांधकामांमध्ये गुदमरून गेलं होतं. हे अनधिकृत बांधकामाचे अतिक्रमण प्रशासनाची डोकेदुखी बनली होती; परंतु मिरकरवाडा बंदर यातून मोकळा श्वास घेऊच शकत नाही, असंच रत्नागिरीकरांना वाटल होतं; परंतु महाराष्ट्राचे मत्स्य व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी महाराष्ट्राच्या बंदरे विकास मंत्रालयाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर महाराष्ट्रातील ७२० कि.मी. च्या किनारपट्टीचा पूर्ण अभ्यास करत, अॅक्शन प्लॅन तयार केला. कोकणच्या किनाऱ्यावरील बंदरे कशापद्धतीने विकसित करता येतील याचे अचूक नियोजन त्यांनी केले.

२७ जानेवारी २०२५ रोजी मिरकरवाडा बंदराला अनधिकृत बांधकाम आणि झोपड्यांपासून मुक्त केले. हे असं होणं शक्यच नाही असं म्हणणाऱ्या आणि वाटणाऱ्या रत्नागिरीकरांना आश्चर्याचा सुखद धक्का मत्स्य व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी दिला. रविवार, २७ जुलै रोजी या मिरकरवाडा बंदर विकासाच्या पहिल्या टप्प्याचा शुभारंभ झाला. रत्नागिरीतील व्यावसायिक स्वरूपाचे हे फार मोठे बंदर आहे.


मिरकरवाडा बंदर विकासाने केवळ रत्नागिरी शहराच्या विकासाला गती मिळणार आहे असे नव्हे, तर कोकणच्या किनारपट्टीवरील महत्त्वाच्या असणाऱ्या या बंदरामुळे व्यापार उद्योगालाही गती मिळणार आहे. ही कोकणच्या विकासाच्या दृष्टीने फार मोठी बाब आहे.

### जाता-जाता...

कोकणात आता खऱ्याअर्थाने श्रावण महिन्यातील सण उत्सवांना प्रारंभ होत आहे. ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस गणेशोत्सव आहे; परंतु कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे या सर्वच जिल्ह्यांमध्ये पाऊसधारा सुरू आहेत. कोकणात जून, जुलै, ऑगस्ट महिन्यात पाऊस पडणे यात विशेष काही नाही. या पावसाळी हंगामात पाऊस पडत असतोच; परंतु हवामान खात्याचे यावर्षीच्या हंगामात रेड आणि ऑरेंज अलर्ट सतत आहेत. कोकणात इतक्या मोठ्याप्रमाणावर पडणाऱ्या पावसाच करायचं काय ? हा प्रश्न कधीच कोकणातील कुणालाच पडत नाही. कोकणात हा अविश्रांतपणे पडणाऱ्या पावसाच्या पाण्याच्या नियोजनाचा विचार होण्याची आवश्यकता आहे. पाऊस पडतोय पाणी नदी, नाल्यांमार्फत थेट समुद्राला जाऊन मिळतंय त्याचा कोकणवासीयांना काही लाभ घेता येत नाही. मार्च, एप्रिल, मे महिन्यात पाणी टंचाई निर्माण होईल का ? याची चिंता सर्वांनाच असते. यामुळे चोहीकडे असणाऱ्या या पाण्याचं नियोजन केल्यास कोकणच्या विकासाला अधिक बळकटी येईल.

कोकणातील आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक सेवाभावी संस्था कार्यरत आहेत. त्यातील एका संस्थेने एक हजार आदिवासी जोडप्यांचा सामूहिक विवाहसोहळा अत्यंत साध्या पद्धतीने पार पाडून लोकांसमोर आदर्श निर्माण केला. तसेच कोकणातील बंदरांच्या विकासकामांना मंत्री नितेश राणे यांच्यामुळे गतिमानता मिळाली आहे, तसेच कोकणातील पाऊस व त्यामुळे वाढणारी चिंता याचा धांडोळा या लेखात घेण्यात आला आहे.







# सरळ चालण्यापेक्षा 'उलटे चालणे' जास्त चांगले

सहसा लोक फिट राहण्यासाठी वेगाने चालतात किंवा धावतात, पण तुम्हाला माहिती आहे का की सरळ चालण्यापेक्षा उलट चालणे शरीरासाठी जास्त फायदेशीर ठरू शकते. यामुळे तुमचे स्नायू मजबूत होतात. संशोधनातून असे दिसून आले आहे की, उलटे चालल्याने बॅलेन्स, फोकस आणि फिटनेसमध्ये सुधारणा होते. उलटे चालण्याचे जबरदस्त फायदे जाणून घेऊया, जे तुमचे आरोग्य सुधारू शकतात.

### स्नायू बळकट होतात

उलटे चालल्याने त्या स्नायूंवर काम केले जाते जे सरळ चालताना कमी सक्रिय असतात. विशेषतः मांड्या, गुडघे याचे स्नायू बळकट होतात. हे पायांची ताकद वाढवण्यास आणि दुखापत होण्याता धोका कमी करण्यास मदत करतात.

### मणक्यावरील ताण कमी होतो

उलटे चालल्याने पाठीच्या कण्यावरील आणि मणक्यावरील ताण कमी होतो. शरीराची स्थिती सुधारते आणि पाठदुखी कमी करण्यास उपयुक्त ठरते.

### गुडघ्यासाठी फायदेशीर

गुडघेदुखी किंवा संधिवात यासारख्या समस्यांनी ग्रस्त असलेल्यांसाठी उलटे चालणे हे वरदानापेक्षा कमी नाही. यामुळे गुडघ्यांवरील दाब कमी होतो आणि सांधे लवचिक होतात.

### मेंदूला चालना

उलटे चालल्याने तुमच्या मेंदूला नवीन आव्हान मिळते. हे मेंदू-समन्वय आणि संतुलन सुधारते. संशोधनातून असे दिसून आले आहे की उलटे चालल्याने स्मरणशक्ती आणि लक्ष केंद्रित होते.

### वजन कमी होण्यास मदत

सरळ चालण्यापेक्षा उलटे चालण्यात जास्त ऊर्जा लागते. यामुळे जास्त कॅलरीज बर्न होतात आणि वजन कमी होण्यास मदत होते.

### हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी

उलटे चालल्याने रक्ताभिसरण सुधारते आणि हृदयाच्या स्नायूंना बळकटी मिळते. यामुळे हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो.



# फक्त १ मिनिट करा ताडासन, तासंतास व्यायाम न करताही व्हाल फिट

बऱ्याचदा असं होतं की आपल्याला व्यायाम करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे इच्छा असूनही व्यायाम करता येत नाही. किंवा काही लोक असे असतात ज्यांना तासनतास व्यायाम करण्याचा खूप कंटाळा येतो. अशा लोकांसाठी एक मिनिटाचे ताडासन करणे खूप फायदेशीर ठरू शकते. काही व्यायाम बराच वेळ करावे लागतात. पण त्याऐवजी १ मिनिटाचे ताडासन केले तरी ते बरेचसे शारिरीक त्रास कमी करण्यासाठी पुरेसे ठरते. ताडासन कसे करायचे आणि त्यामुळे शरीराला नेमके काय फायदे होतात ते पाहूया..

ताडासन कसे करायचे?

ताडासन करण्यासाठी सगळ्यात आधी जमिनीवर योगा मॅट किंवा सतरंजी टाकून ताठ उभे राहा.

त्यानंतर तुमचे दोन्ही हात एकमेकांत बांधा आणि ते वर एका सरळ रेषेत घ्या.

आता दिर्घ श्वास घेत पायाचे घोटे उचला खांदे मागच्या बाजुने ओढल्यासारखे करा आणि शरीराचा सगळा भार पायाच्या बोटांवर घ्या.

नजर तुमच्या समोर असणाऱ्या एखाद्या वस्तूवर स्थिर करा आणि ही आसनस्थिती ५० ते ६० सेकंद टिकविण्याचा प्रयत्न करा. अशा पद्धतीने तुम्ही २ ते ३ वेळाही ताडासन करू शकता.

ताडासन केल्याने काय फायदे होतात?

अभ्यासानुसार पाठीच्या कण्यासाठी आणि बॉडी पोश्चर सुधारण्यासाठी ताडासन करणे फायदेशीर ठरते.

गुडघे आणि पायाचे घोटे मजबूत होण्यासाठी ताडासन करणे उपयुक्त ठरते. गुडघे दुखत असतील तर नियमितपणे ताडासन करावे.

काही जणींच्या नेहमीच पोटऱ्या दुखतात, ओढल्यासारख्या होतात. हा त्रास कमी करण्यासाठी ताडासन करावे.

एकाग्रता वाढण्यासाठीही ताडासन उपयुक्त ठरते. त्यामुळे मुलांनाही ते करायला लावावे.

ताडासन नियमितपणे केल्यास मुलांची उंचीसुद्धा वाढते.



# सकाळी झोपेतून उठल्यावर थकवा-आळस जाणवतो? घ्या 'या' टिप्स, दिवसभर राहाल फ्रेश!

आजकाल लोक इतके बिझी झाले आहेत की, स्वत:ची काळजी घेण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नसतो. याचा थेट प्रभाव मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर पडतो. वेळ मिळत नसल्याने एक्सरसाईज केली जात नाही. लोक जंक आणि फास्ट फूड जास्त खात आहेत. ज्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमजोर होत आहे. अनेकांना सकाळी झोपेतून उठल्यावरही शरीरात अस्वस्थता, कमजोरी, थकवा आणि आळस जाणवतो. अशात सकाळी या समस्या जाणवू नये म्हणून आम्ही काही टिप्स सांगत आहोत.

**थकवा आणि स्ट्रेस दूर करण्याच्या टिप्स**

### १) मेडिटेशन

मानसिक शांतता मिळवण्यासाठी सकाळी उठून मेडिटेशन केलं पाहिजे. सकाळी झोपेतून उठल्यावरही थकवा आणि सुस्ती राहण्याची कारण रात्री व्यवस्थित झोप न येणं आणि मानसिक तणाव असू शकतात. ही समस्या दूर करण्यासाठी मेडिटेशन एक चांगला पर्याय आहे. मोकळ्या हवेत डोकं फ्रेश करण्यासाठी २० ते २५ मिनिटं मेडिटेशन करा.

### २) स्ट्रेचिंग एक्सरसाईज

सकाळी झोपेतून उठल्यावर अनेकदा कमजोरी किंवा थकव्यामुळे शरीरात आखडलेपणा येतो. हे टाळण्यासाठी सकाळी स्ट्रेचिंग एक्सरसाईज करू शकता. स्ट्रेचिंग एक्सरसाईज केल्यानं शरीरातील मांसपेशी मोकळ्या होतात आणि शरीराला आराम मिळतो.

### ३) तेलानं करा बॉडी मसाज

थकवा दूर करण्यासाठी कोमट तेलानं मालिश करणं हा एक फार जुना उपाय आहे. तेलानं मालिश केल्यानं मांसपेशींना आराम मिळतो. मालिश केल्यावर शरीर ॲक्टिव राहतं आणि थकवा दूर होतो. तेलानं शरीराची मालिश केल्यावर मानसिक तणावही दूर होतो.

### ४) कोमट पाण्यानं आंघोळ

शरीराचा थकवा दूर करण्यासाठी गरम पाणी खूप फायदेशीर ठरतं. शरीर रिलॅक्स करण्यासाठी आणि ॲक्टिव राहण्यासाठी गरम पाण्यानं आंघोळ करा. याला हीट थेरपी म्हटलं जातं. गरम पाण्यानं आंघोळ केल्यानं सुस्ती आणि थकवा लगेच दूर होतो.




# रोज ब्लॅक कॉफी पिण्याचे ७ फायदे

चहा की कॉफी हा वाद काही कधी संपणार नाही. चवीचं माहिती नाही, पण शरीरासाठी कॉफी चहापेक्षा नक्कीच चांगली असते. कॉफी पिण्याचे काही फायदे आहेत. पण आपण जसी कॉफी पितो तशी नाही. साधी ब्लॅक कॉफीच. ते ही योग्य प्रमाणात प्यायल्यास शरीरासाठी उपयुक्त ठरेल. अति कॉफी चांगली नाही. त्यात जर साखर घालत आहात किंवा क्रिम वापरत आहात तर, त्याचा शरीरासाठी काही उपयोग नाहीअशाने चांगले नाही तर वाईटच परिणाम होतील.

१. कॉफीमध्ये कॅफेन असते ज्यामुळे तरतरी येते. आळस दूर होतो. म्हणून जागरण करून काम करणारे लोक कॉफी पितात. शरीराच्या कार्यक्षमतेला कॅफेनमुळे उत्तेजन मिळते.

२. कॉफी वजन कमी करण्यासाठीही फायदेशीर ठरते. त्यामुळे ज्यांना वजन कमी करायचे आहे, त्यांनी चहाऐवजी कॉफी प्यायला सुरवात करा. रोज एक किंवा दोन कपच प्या. कॉफीचा अतिरेक नको.

३. रक्तामध्ये एड्रेनालाईन नामक एक रस असतो. जो हार्मोन, ताणतणाव तसेच रक्त प्रवाहाचे कार्य सुरळीत ठेवण्यासाठी मदत करतो. एड्रेनालाईनचे कार्य नीट चालावे यासाठी कॉफीचा फायदा होतो.

४. मधुमेहाचा धोका कॉफी प्यायल्याने कमी होतो. ज्यांना मधुमेहाचा त्रास आहे. त्यांच्यासाठी कॉफी हा एक चांगला पर्याय आहे. असे काही अभ्यासांमधून सिद्ध झाले आहे.

५. रेडक्लिफेबल.कॉम यांच्या मते कॉफी प्यायल्याने स्मरणशक्ती वाढते. गोष्टी विसरण्याची सवय असलेल्या लोकांनी कॉफी प्यावी. तसेच आकलन शक्ती ही कॉफीने वाढते. लक्ष केंद्रित करण्यासाठी कॉफी उपयुक्त असते.

६. लिव्हरचा त्रासही कॉफीमुळे कमी होतो. पोटासाठीही कॉफी चांगली असते. डोपामाइनची पातळी संतुलित ठेवण्यासाठी कॉफी उपयुक्त ठरते.

७. त्वचेसाठी कॉफी चांगली असते. म्हणूनच कॉफीपासून म्हणजेच कॅफेनपासून तयार केलेले अनेक प्रॉडक्ट बाजारात मिळतात. कॉफी पावडरचा वापर करून चेहऱ्यासाठी लेपही तयार करता येतो. कॉफीमध्ये पाणी घालून त्यात कोरफडीचा अर्क घालायचा. चेहर्यालसाठी स्क्रब म्हणून वापरायचा. नंतर कोमट पाण्याने धुवून टाकायचा. त्वचा स्वच्छ होते.



# तुम्हीही कागदी कपमध्ये चहा किंवा कॉफी पिता का?त्याचे दुष्परिणाम जाणून घ्या

आजकाल सर्वत्र पेपर कपचा वापर वाढत आहे. हे कप चहा, कॉफी किंवा इतर पेये घेण्यासाठी खूप सोयीस्कर आहेत. पण तुम्हाला माहिती आहे का कागदाच्या कपमध्ये चहा किंवा कॉफी पिणे तुमच्या आरोग्यासाठी किती धोकादायक असू शकते?

### कागदी कपमध्ये लपलेला धोका:

**१. रसायने:** पेपर कप बनवण्यासाठी अनेक रसायने वापरली जातात, जसे की फॉर्मल्डिहाइड, डायऑक्सिन्स आणि पॉलीक्लोरिनेटेड बायफेनिल्स (पीसीबी). ही रसायने गरम पेयांच्या संपर्कात आल्यावर पाण्यात विरघळू शकतात आणि आपल्या शरीरात प्रवेश करू शकतात.

**२. एक्सट्रुडेड पॉलिस्टीरिन:** काही पेपर कपमध्ये एक्सट्रुडेड पॉलिस्टीरिन (EPS) चे अस्तर असते, जे एक प्रकारचे प्लास्टिक आहे. गरम पेयांच्या संपर्कात आल्यावर EPS हानिकारक रसायने सोडू शकते, जी आपल्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात.

**३. हार्मोन्स:** पेपर कपमध्ये वापरले जाणारे काही रसायने हार्मोन्सच्या पातळीवर परिणाम करू शकतात, ज्यामुळे प्रजनन क्षमता, थायरॉईड ग्रंथी आणि इतर आरोग्य समस्या उद्भवू शकतात.

**४. कर्करोगाचा धोका:** काही अभ्यासातून असे दिसून आले आहे की पेपर कपमध्ये वापरल्या जाणाऱ्या काही रसायनांमुळे कर्करोगाचा धोका वाढू शकतो.

### काय करायचं?

**१. स्टील किंवा मातीची भांडी वापरा:** शक्य तितके स्टील किंवा मातीच्या भांड्यांमध्ये चहा किंवा कॉफी प्या. ही भांडी सुरक्षित आणि पर्यावरणपूरक आहेत.

**२. पेपर कपचा वापर कमी करा:** जर तुम्हाला पेपर कप वापरायचे असतील तर गरम पेयांसाठी डिझाइन केलेले कप वापरा.

# जास्त प्रमाणात पाणी पिणंही ठरू शकतं घातक



**जाणून घ्या किती पाणी पिणं शरीरासाठी योग्य!**

**पाणी शरीरासाठी किती गरजेचं असतं हे सगळ्यांनाच माहीत आहे. पाण्याचं मदतीनं शरीरातील वेगवेगळी कामं करण्यास मदत मिळते. पाण्यानं शरीर हायड्रेट राहतं आणि अनेक प्रकारच्या आजारांपासून बचाव होतो. एक्सपर्ट दिवसभर भरपूर पाणी पिण्याचा सल्ला देत असतात. मात्र, प्रमाणापेक्षा जास्त पाणी पिणं आरोग्यासाठी नुकसानकारक ठरतं. जास्त पाणी प्यायल्यास ओवरहायड्रेशनची समस्या होते. ज्याला वॉटर इंटाक्सिकेशन असंही म्हणतात. जास्त पाणी प्यायल्यास किडनीवर दबाव पडतो आणि अनेक प्रकारच्या समस्या होतात.**

### पाणी पिण्याची योग्य पद्धत

पाणी नेहमीच योग्य पद्धतीनं प्यायला हवं. पाणी कधीच घाईघाईनं पिऊ नये. पाणी हळूहळू एक एक घोट प्यावं. जेणेकरून ते शरीरात ते अब्जॉर्ब व्हावं. खूप जास्त थंड किंवा गरम पाणी कधीच पिऊ नये. पाणी जेवण झाल्यावर नेहमी अर्ध्या तासांनंतर प्यावं. जेणेकरून पचनक्रिया चांगली व्हावी. जेवण केल्यावर लगेच पाणी प्यायल्यास पचनक्रिया स्लो होते. सकाळी उपाशीपोटी पाणी पिणं फायदेशीर असतं. असं केल्यास शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात.

### काय काळजी घ्याल?

रोज तुम्ही योग्य प्रमाणात पाणी पित आहात याची काळजी घ्या. पण प्रमाणापेक्षा जास्त पाणी पिणं टाळलं पाहिजे. कारण यानं शरीरात सोडिअमचं संतुलन बिघडतं, ज्यामुळे हायपोनेट्रेमियाचा धोका वाढतो. पाण्याचं प्रमाणं प्रमाणा तुमच्या शरीराच्या गरजांनुसार बदलू शकतं. पण एकूणच काय तर दिवसभर भरपूर पाणी प्यावं.

### पाणी पिण्याचं योग्य प्रमाण

सामान्यपणे एका हेल्दी व्यक्तीनं दिवसातून ८ ते १० ग्लास म्हणजे साधारण २ ते अडीच लीटर पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. पण हे प्रमाण तुमचं वय, वजन लिंग, फिजिकल अॅ क्टिविटी आणि वातावरणावरही अवलंबून असतं. तुम्ही जास्त एक्सरसाईज करत असाल आणि तुमचा जास्त घाम जात असेल तर पाणी पिण्याचं प्रमाण वाढेल. जर तुम्ही आजारी असाल आणि औषधांचं सेवन करत असाल तर पाण्यात प्रमाणात बदल होऊ शकतो.

# २६ लाख अपात्र 'लाडक्या बहिणीं'मध्ये १४ हजार पुरुष आले कुठून? सरकार वाटलेले पैसे परत कसे मिळवणार?

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

ज्या योजनेमुळे देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वात महायुती सरकार २०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर सत्तेत बहुमतानं आलं, त्या 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'बद्दल नवे वाद सातत्यानं घडून येत आहेत. आता अजून एक धक्कादायक माहिती, जी स्वतः सरकारधल्या मंत्र्यांनीच जाहीररित्या दिली आहे, ती म्हणजे केवळ 'बहिणीं'साठी असलेल्या या योजनेचा लाभ पुरुषही घेत होते आणि त्यांच्या खात्यात या योजनेची रक्कम विनासायास जमा होत होती.

आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, थोडेथोडके नव्हे तर तब्बल १४ हजार २९८ पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतल्याचं समोर आलं आहे.

महिलांच्या योजनांचा लाभ सरकारनं पुरुषांना देणं हे धक्कादायक आहेच, पण सरकारच्याच छाननीनतून यासारख्याच इतर गंभीर त्रुटीही समोर आल्या आहेत.

महाराष्ट्र सरकारच्या ज्या खात्यातर्फे ही योजना राबवली जाते आहे, त्या महिला व बालकल्याण मंत्रालयाच्या मंत्री आदिती तटकरे यांनी समाजमाध्यमांवर जाहीर कबुली दिली आहे.

काही लाभार्थी एकापेक्षा जास्त योजनांचा लाभ घेत असल्याचे, काही कुटुंबामध्ये २ पेक्षा जास्त लाभार्थी असल्याचे, तर काही ठिकाणी पुरुषांनी अर्ज केल्याच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत, असं आदिती तटकरे यांनी 'एक्स' या समाजमाध्यमावर लिहिलेल्या पोस्टमध्ये स्पष्टपणे म्हटलं आहे.

'लाडकी बहीण योजने'चे हे अपात्र लाभार्थी, ज्यांना प्रतिमहिना १५०० रुपयांचा हा लाभ मिळणं अपेक्षित नाही, त्यांची संख्या थोडीथोडकी नाही.

'माहिती व तंत्रज्ञान विभागाने सुमारे २६.३६ लाख लाभार्थी अपात्र असताना देखील लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत असल्याची माहिती सादर केली आहे,' असं आदिती तटकरेंनी जाहीर केलं.सरकारनं या 'अपात्र' लाभार्थ्यांना मिळणारी रक्कम तूर्तास स्थगित केली असली तरीही, पात्र नसतांनाही सरकारी तिजोरीतून दिल्या गेलेल्या पैशांची जबाबदारी कोणाची, हा प्रश्न सरकारला अडचणीत आणणारा आहे. हा एका प्रकारचा 'अपहार' च नव्हे का?




ही जबाबदारी खोटी माहिती देऊन लाभ घेणा-या लाभार्थींची की मिळालेल्या माहितीची योग्य पडताळणी न करता निवडणुकीकडे लक्ष ठेवून अधिकाधिक जणांना पैसे वाटणाऱ्या सरकारी यंत्रणेची? त्यापेक्षाही महत्वाचा प्रश्न म्हणजे, या अपात्रांना जेवढे पैसे वाटले गेले, ते पैसे त्यांच्याकडून कसे परत मिळवणार?

'ही योजना गरीब बहिणींना मदत व्हावी म्हणून सुरु केली होती. तोच उद्देश होता. मात्र, त्याचा कोणी गैरफायदा घेतला असेल तर आम्ही कारवाई करु. काही पुरुषांनीही या योजेनेचा फायदा घेतल्याचं समजतं आहे. ते खरं असेल तर आम्ही त्यांच्याकडून ते वसूल करु,' असं उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार माध्यमांशी बोलतांना म्हणाले.

**सुरुवातीपासून योजनेवर झाली टीका**

जेव्हापासून मध्य प्रदेशातल्या योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीआधी 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेची घोषणा करण्यात आली, तेव्हापासून या योजनेभोवती वाद होत आहेत.

निवडणुकीवर डोळा ठेवून ही पैसे वाटपाची योजना सरकारनं आणली, असा आरोप विरोधी पक्षांनी वारंवार केला. तो परिणाम निवडणुकीत दिसलाही.

पण राजकीय अभिनिवेशातून आलेल्या आरोपांपेक्षा व्यावहारिक आर्थिक आणि प्रशासकीय प्रश्न अधिक गंभीर आहेत.

सरकारनं २१ ते ६५ वयोगटातल्या आणि कुटुंबाचं वार्षिक आर्थिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या राज्यातल्या सगळ्या महिलांना महिना १५०० रुपये देण्याची ही योजना आहे.

कोणत्याही अधिकच्या उत्पन्नापेक्षा सरकारच्या तिजोरीवर हजारो कोटींचा अतिरिक्त बोजा टाकणाऱ्या या योजनेसाठी पैशांची तरतूद कशी करावी, हा प्रश्न होताच.

चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात त्यासाठी ३६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली गेली आहे.

या पैशांसाठी इतर विभागाच्या योजनांना कात्री लावली गेली, असे आरोप खुद्द सरकारमधल्या मंत्र्यांनीच केले आहेत. सरकारची दमछाक लपून राहिली नाही.

पण उपलब्ध वेळेत कागदपत्रांची पडताळणी व्यवस्थित न करता लाभार्थ्यांची यादी तयार होते आहे, अशा प्रकारच्या तक्रारी पहिल्यांदा योजना सुरु झाल्या तेव्हापासूनच येत होत्या.

निवडणुकीनंतर सरकारनंही या योजनेच्या लाभार्थींच्या माहितीची पडताळणी करावी लागेल, असं म्हटलं होतं. आजपर्यंत २ कोटी ५३ लाख लाभार्थींना या योजनेतून पैसे मिळाले आहेत. पण त्यातले खरे किती आणि खोटे किती, या प्रश्नाचं उत्तर सरकार स्वतःच शोधत होतं. त्यासाठी सरकारनं शोध-पडताळणी सुरु केली होती.

आदिती तटकरे काय म्हणाल्या?

या पडताळणीनुसार आतापर्यंत २६ लाखापेक्षा अधिक लाभार्थी हे अपात्र आहेत, हे स्पष्ट झालं. यातल्या काही जणी एकापेक्षा अधिक सरकारी योजनांचा लाभ घेत होत्या.

काहींनी अधिक उत्पन्न गटात असूनही अर्ज केला आणि लाभ मिळवला. पण सगळ्यात धक्कादायक म्हणजे, पुरुषांनीही या योजनेतून अधिकृत नाव नोंदवून पैसे मिळवले.

आदिती तटकरे यांच्या म्हणण्यानुसार या सगळ्या 'अपात्र' लाभार्थींना मिळणारा निधी आता थांबवण्यात आला आहे.

'जून २०२५ पासून या २६.३४ लाख अर्जदारांचा लाभ तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला आहे,' असं तटकरेंनी त्यांच्या पोस्टमध्ये लिहिलं.

सरकार अपात्रांचे पैसे थांबवून चूक दुरुस्त केली असं जरी सांगत असलं, तरीही, मुख्य प्रश्न उतरतोच. तो म्हणजे, 'अपात्रां'ना जे पैसे वाटले गेले, ते किती आहेत आणि ते सरकारचे पैसे परत कधी आणि कसे मिळवणार?

तटकरे म्हणतात, या कारवाईबद्दल मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांशी बोलून निर्णय घेण्यात येईल.

ज्या अधिकाऱ्यांनी अशा निकषात न बसणाऱ्या व्यक्तींना पात्र ठरवलं, त्यांच्यावर कारवाई व्हावी असं ते म्हणतात.'माझ्या मते ही पूर्णपणे शासकीय यंत्रणेची चूक आहे आणि त्याची शिक्षा व्हायला पाहिजे. सरकारं निर्णय घेतला, या योजनेचे निकष ठरवले. त्या निकषांनुसार अर्जांची छाननी करणं आणि कोण अपात्र हे ठरवणं हे प्रशासनाचं काम असतं. अर्ज करणारा करतच असतो, तो पात्र की अपात्र हे प्रशासन ठरवत असतो. त्यांनी व्यवस्थित छाननी करुन जे निकषात बसत नाहीत त्यांना बाजूला का नाही केलं? याचा अर्थ त्यांनी कर्तव्यात कसूर केली,' महेश झगडे बोलताना म्हणाले.

झगडे यांच्या मते ज्या प्रकारे छाननी करता हा लाभ दिला गेला, तो भ्रष्टाचारच आहे.

'अपात्र नसलेल्यांना ते मिळू देणं हा भ्रष्टाचारच आहे. जर कोणी पुरुष अर्ज करत असेल तर तो महिला नाही हे डोळ्यांना दिसू नये? पैसे असे वाटलेच कसे गेले? त्यामुळे ज्यांनी हे केलं त्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावे. अर्जदारांवर कारवाई करण्यापेक्षा ज्यांनी पात्रता न तपासता लाभ मिळू दिला, त्यांच्यावर कारवाई व्हावी,' झगडे पुढे म्हणाले.

## राज ठाकरेंचे खासदार वर्षा गायकवाड यांना पत्र

■**मुंबई । प्रतिनिधी,**

मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांना पत्र लिहिलं आहे. भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांना घेरल्यामुळे ठाकरेंनी हे पत्र लिहिले आहे. लोकसभेच्या अधिवेशनादरम्यान महाराष्ट्रातील खासदारांनी भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांना घेरलं होतं. तसेच दुबे यांच्या विरोधात घोषणाबाजी केली होती. त्यानंतर आता राज ठाकरे यांनी वर्षा गायकवाड यांना पत्र लिहून त्यांचे कौतुक केले आहे. मराठी माणसाला आपटून आपटून मारू निशिकांत दुबे म्हणाले होते.



**राज ठाकरेंच्या पत्रात काय आहे?**

राज ठाकरेंनी वर्षा गायकवाड यांना उद्देशून एक पत्र लिहिलं आहे. मराठी माणसानां आपटून आपटून मारू, अशी दर्पोक्ती करणाऱ्या निशिकांत दुबेला तुम्ही संसदेत घेराव घातलात आणि त्याला जाब विचारलात याबद्दल तुमचं मनापासून अभिनंदन. महाराष्ट्राचा, मराठी माणसाचा, मराठी भाषेचा अपमान, अन्याय होत असताना संसदेत महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करणारे खासदार गप्प असतात, असं चित्र मराठी जनांच्या समोर येत होतं. त्याला तुम्ही कृतीने छेद दिलात. याबद्दल तुमचं खरंच मनापासून आभार, असं राज ठाकरे यांनी आपल्या पत्रात वर्षा गायकवाड यांना उद्देशून म्हटलं आहे.

**राज ठाकरेंनी व्यक्त केली खंत**

महाराष्ट्राला सध्या व्यापक भूमिका घेण्याच्या विचारांनी ग्रासले लं आहे. माज्या मते हा उगाच ओढवून घेतलेला न्यूनगंड आहे. महाराष्ट्राने देशाचा विचार केला पाहिजे हे खरं आहे. कारण देशाचा विचार करावा आणि देशासाठी काही करावं अशी क्षमता असलेली जी काही मोजकी राज्य आहेत त्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे.

पण म्हणून आपण मराठी आहेत, मराठी जनतेने आपल्याला निवडून दिलं आहे, त्यामुळे या जनवेप्रती, या प्रांताबद्दल आपली जबाबदारी पहिली आहे याचा विसर पडायला लागला आहे, अशी खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

**तुम्ही ती ताकद दाखवलीत याबद्दल...**

सव्वाशे वर्ष हिंद प्रांतावर राज्य करणाऱ्या आणि १८५७ चा उठाव असू दे की पुढचा स्वातंत्र्यलढ्याला आकार देणे असूदेत. यात मरहट्टे होते. याचा आपल्याला विसर पडतो आणि म्हणूनच या उत्तरेतील मुजोरंना दिल्लीत सातत्याने महाराष्ट्र आणि मराठीची माणसाची ताकद दाखवलीच पाहिजे. तुम्ही ती ताकद दाखवलीत याबद्दल मनापासून आभार, असेही मत ठाकरे यांनी आपल्या पत्रात व्यक्त केले आहे. तुमचे कौतुक करावे तेवढे कमी आहे तसेच, महाराष्ट्रातील इतर ४५ खास दार गप्प का बसले माहीत नाही. पण तुम्ही हिंमत दाखवलीत याबद्दल तुमचे कौतुक करावे तेवढे कमी आहे.

महाराष्ट्रासाठी तुमचा संसदेतील आवाज असाच बुलंद राहील अशी आशा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची आहे, अशा भावना राज ठाकरे यांनी व्यक्त केल्या. तसेच महाराष्ट्र, मराठी भाषा आणि मराठी माणूस यासमोर कोणतेही आपले वैचारिक मतभेद अत्यंत क्षुद्र आहेत, असे सांगायलाही राज ठाकरे विसरले नाहीत.

## खड्ड्यांच्या तक्रारी वाढल्या, बीएमसीच्या काँक्रिटीकरण मोहिमेवर प्रश्नचिन्ह

■**मुंबई । प्रतिनिधी,**

पावसाळा सुरू होताच मुंबईच्या रस्त्यांवर पुन्हा खड्ड्यांचा स्फोट झाला असून, बीएमसीच्या खड्डेमुक्त मोहिमेवर मोठं प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. जून ते जुलैच्या मध्यात तब्बल ६,७५८ खड्ड्यांच्या तक्रारी नोंदवण्यात आल्या. अंधेरी पश्चिम आणि भांडुप हे सर्वाधिक तक्रारींचे हॉटस्पॉट ठरले. खड्ड्यांची तक्रार वाढत असताना, खड्डे बुजवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मास्टिक डांबराचा वापर मात्र घटलेला दिसतो. गेल्या वर्षी २५,६३२ मेट्रिक टन वापरण्यात आले, तर यंदा केवळ ६,५४८ मेट्रिक टनच. मास्टिक कुकरही ३३ वरून २४ वर आले. १७,००० कोटींच्या काँक्रिटीकरण प्रकल्पातून ७०० किमी रस्ते सुधारण्याचा दावा बीएमसीने केला असला, तरी आताही जून ते जुलैच्या मध्यापर्यंत ६,७५८ हून अधिक खड्ड्यांच्या तक्रारी नोंदवण्यात आल्या आहेत. अंधेरी पश्चिम (के/पश्चिम वॉर्ड) मध्ये सर्वाधिक ४८८ तक्रारी, तर भांडुप (एस वॉर्ड) मध्ये ४५३ तक्रारी नोंदवण्यात आल्या आहेत.



बृहन्मुंबई महानगरपालिकेने (इटउ) मान्सूनपूर्वी ४९% रस्ते काँक्रिटीकरण करून मुंबई खड्डेमुक्त करण्याची मोहीम हाती घेतली होती. तरीही, या वर्षी तक्रारींमध्ये वाढ झाल्याचे आकडेवारी दर्शवते. २०२२ मध्ये सुरू झालेल्या रस्ते काँक्रिटीकरण प्रकल्पाचा उद्देश खड्डे हटवणे आहे, उर्वरित काम ऑक्टोबरमध्ये पुन्हा सुरू होणार आहे. १ जून ते १५ जुलै दरम्यान, खड्ड्यांच्या तक्रारी २०२४ मधील ६,२३१ वरून २०२५ मध्ये ६,७५८ पर्यंत वाढल्या आहेत, ज्यामुळे सततच्या प्रयत्नांनंतरही वाढ झाल्याचे दिसते. या समस्येवर मात करण्यासाठी, बीएमसीने प्रत्येक वॉर्डात रस्ते अभियंते तैनात केले आहेत, जे दररोज तपासणी करतात. नागरिक सोशल मीडिया, नागरिक आपत्कालीन हेल्पलाइन आणि माय पॉटहोल क्विक फिक्स ॲपद्वारे तक्रारी नोंदवू शकतात. एकूण तक्रारींपैकी ३,४६१ या डिजिटल माध्यमांतून, तर ३,२९७ नागरिकांनी अभियंत्यांकडे थेट तक्रारी केल्या. या वर्षी, बीएमसीने आपल्या २२७ वॉर्डांपैकी प्रत्येक वॉर्डमध्ये एक रस्ते अभियंता नियुक्त केला आहे. हे अभियंते १०-१५ किमीच्या परिसरात अजून काँक्रिटीकरण न झालेल्या डांबरी आणि पेव्हर-ब्लॉक रस्त्यांसाठी दररोज तपासणीसाठी जबाबदार आहेत आणि २४ ते ४८ तासांच्या आत खड्ड्यांच्या तक्रारी सोडवणे अपेक्षित आहे. महापालिकेने दुरुस्तीसाठी १५४ कोटी रुपये वाटप केले आहेत, जे गेल्या वर्षीच्या २०५ कोटी रुपयांपेक्षा कमी आहे. मुंबईचे रस्ते जाळे २,०५० किमी लांब असून, १,३३३ किमी रस्ते आधीच काँक्रिटीकृत आहेत. उर्वरित ७०० किमी डांबरी आणि पेव्हर-ब्लॉक रस्ते १७,००० कोटी रुपयांच्या महा-मोहिमेचा भाग म्हणून काँक्रिटीकृत केले जातील. या प्रकल्पाचा उद्देश शहरात ७०० किमी रस्ते काँक्रिटीकृत करणे आहे. पहिल्या टप्प्यात ३२० किमी (७०० रस्ते) आणि दुसऱ्या टप्प्यात ३७८ किमी (१,४२१ रस्ते). असे असले तरी आजची दयनीय परिस्थिती पहाता, मुंबईकर खड्ड्यांमुळे नाराजी व्यक्त करत आहेत. खड्डे हटवण्याच्या गाजावाजा मोहिमेकडे पाहता, खड्ड्यांच्या वाढत्या तक्रारी शहराच्या नियोजनशून्यतेचं आणि ढिसाळ अंमलबजावणीचं प्रत्यक्ष चित्र दाखवतात. मुंबईकर मात्र अजूनही 'खड्ड्यांमध्ये' अडकलेलेच आहेत.

## कल्याण परिसरात मंगळवारी पाणीपुरवठा बंद

**कल्याण** : कल्याण-डोंबिवली पालिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या मोहिली येथील जलशुद्धीकरण केंद्रात देखभाल दुरुस्ती आणि महावितरणचे वीज मीटर जोडणीचे काम मंगळवारी करावयाचे आहे.या कामांसाठी मोहिली जलशुध्दीकरण केंद्र येत्या मंगळवारी बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे या जलशुध्दीकरण केंद्रातून पाणी पुरवठा होणाऱ्या कल्याण शहराचा काही भाग ग्रामीण भागाचा पाणी पुरवठा मंगळवारी सकाळी दहा ते संध्याकाळी सहा या वेळेत बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती कल्याण डोंबिवली पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक घोडे यांनी दिली.मोहिली जलशुद्धीकरण केंद्र उल्हास नदीच्या काठावर मोहिली गाव हद्दीत आहे. या केंद्रातून पाणी पुरवठा होणाऱ्या मांडा, टिटवाळा, बल्याणी, बनेली, आंबिवली, शहाड, अटाळी आणि परिसरातील ग्रामीण भागातील काही गावे, याशिवाय कल्याण पश्चिमेतील 'ब' प्रभाग हद्दीतील मिलिंदनगर, योगीधाम, चिकनघर, बिर्ला महाविद्यालय परिसर, म्हाडा कॉलनी परिसर, मुरबाड रस्ता, सिंडिकेट परिसराला होणारा पाणी पुरवठा मंगळवारी बंद राहणार आहे.त्याचप्रमाणे दुरुस्तीच्या कामाच्यावेळी महावितरणकडून मोहिली जलशुध्दीकरण मीटर युनिट बसावयाचे आहेत. दिवसभरात किती पाणी उचलले, शुध्द केले याची मोजणी या मीटरच्या माध्यमातून केली जाते. ही अत्यावश्यक कामे मोहिली जलशुध्दीकरण केंद्रात करावयाची असल्याने मंगळवारी कल्याण शहराच्या काही भागाचा पाणी पुरवठा बंद राहणार आहे. कल्याण पूर्व, डोंबिवली शहराचा पाणी पुरवठा नियमित सुरू राहणार आहे, असे पालिकेने स्पष्ट केले आहे.

## रोज ५० लाख लिटर पाणी, तरी टँकरवर मदार



**विरार** :

टँकरमाफीयांना फायदा व्हावा म्हणून महापालिकेकडून होत असलेला पाणीपुरवठा कमी दाबाने सोडण्याचा प्रकार विरार पश्चिम भागात आमदार राजन नाईक यांनी नुकताच उघडकीस आणला आहे. संबधित सोसायट्यांमध्ये दररोज ५० लाख लिटरहून अधिक पाणी पुरवठा होत असूनसुध्दा टँकरद्वारे पाणी मागविण्यात येत आहे. स्थानिक आणि त्यांना होणाऱ्या पाणीपुरवठ्याचा हिशोब महापालिका प्रशासन घेणार आहे. विरार पश्चिम येथील ग्लोबल सिटी रुस्तमजी, एचडीआयएल परिसरातील गृहनिर्माण संस्थांना पाणीपुरवठा व्हावा यासाठी त्या ठिकाणी पाण्याची टाकी बांधणे आवश्यक होते. मात्र पालिकेची जागा नसल्याने खासगी जागेवर २० लाख ली. क्षमतेची पाणी टाकी बांधून देण्यासाठी संबंधित विकासकांना पालिकेकडून इमारत बांधकामात ह्यटीडीआरह्ण वाढवून देण्यात आला. ८ ते १० वर्षांपासून टोलेजंग इमारती उभ्या असतानाही त्या ठिकाणी पालिकेकडून पाणीपुरवठा करण्यात येत नव्हता. आता ऑक्टोबर २०२४ पासून प्रतिदिन ५० लाख ली.हून अधिक पाणीपुरवठा या परिसरात करण्यात येत आहे. असे असतानाही मागील दोन-तीन महिन्यांपासून कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्यामुळे स्थानिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून रहावे लागत आहे. मुबलक पाणी असतानाही केवळ टँकर माफियांना फायदा व्हावा यासाठी हे सुरू आहे अशा तक्रारी अनेक रहिवाशांनी आ. राजन नाईक यांच्याकडे केल्या आहेत. त्यांनी व्हॉल्वची तपासणी केली. त्यावेळी वॉलमनकडून फक्त ५० टक्केच वॉल उघडली जात असल्याचे उजेडात आले. टँकर माफीयांचा फायदा व्हावा यासाठीच हे केले जात असल्याने या ठिकाणी पालिकेने त्यांचे वॉलमन नेमण्याची तसेच या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

## अखेर त्या जागेवरील खेळणी पालिकेने हटवली



**विरार**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आय प्रभागातील बेनापट्टी हिंदू स्मशानभूमीतील वादाचे कारण ठरलेली लहान मुलांची खेळणी अखेर पालिकेने तत्काळ कारवाई करून हटवली आहेत. मात्र पालिकेने केलेल्या कारवाईमुळे राजकीय वातावरण तापले आहे. नागरिकांच्याच मागणीनुसार ही खेळणी बसवण्यात आली होती, अशी माहिती परिसरातील नागरिकांनी दिली आहे. वसई पश्चिमेकडील बेनापट्टी येथील स्मशानभूमीमध्ये मोकळ्या असलेल्या जागेत नागरिकांच्या मागणीनुसार त्या ठिकाणी लहान मुलांची खेळणी बसवण्यात आली होती.

मात्र ही खेळणी पावसाच्या अगोदर बसवण्यात आली असल्यामुळे वादाच्या भर्वयात सापडली होती. मात्र ही खेळणी चुकीच्या पद्धतीने बसवण्यात आली असल्याचा आरोप करत राजकीय नेत्याने कारवाईची मागणी केली होती.

त्यानंतर पालिकेने तत्काळ त्या स्मशानभूमीमधून ती खेळणी हटवून जागा मोकळी करून घेतली आहे. वसई पश्चिमेतील बेनापट्टी, चुळणागाव, माणिकपूर या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर नागरी वस्ती असून मोकळ्या जागांचा अभाव आहे. त्यामुळे अशा उपक्रमांना स्थानिकांनी पाठिंबा दिला होता. मात्र प्रशासनाने राजकीय दबावामुळे कारवाई केली असल्याचा आरोप काही नागरिकांकडून करण्यात येत आहे. या संपूर्ण प्रकरणावरून स्पष्ट होते की, नागरी मागण्या आणि धार्मिक-सामाजिक संवेदनशीलता यांचा समतोल राखताना प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना अधिक काळजीपूर्वक भूमिका घ्यावी लागेल. सध्या तरी वादग्रस्त जागा मोकळी करण्यात आली असली तरी परिसरातील नागरिकांत नाराजी आणि संभ्रमाचे वातावरण कायम आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधीन राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by Dr. Mr. Deepak Moreshwar Naik. Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com